पुढारी




पुणे : सहकार आयुक्त सौरभ राव यांचे स्वागत करताना 'रवळनाथ'चे अध्यक्ष एम. एल. चौगुले. शेजारी डॉ. आर. एस. निळपणकर आदी.

# 'रवळनाथ'ने घेतली सहकार आयुक्तांची भेट

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

सहकार क्षेत्राच्या वृद्धीसाठी येथील श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी लि., आजरा (मल्टिस्टेट) प्रधान कार्यालय गडहिंग्लज या संस्थेतर्फे पुणे विभागाचे नूतन सहकार आयुक्त तथा सहकारी संस्थांचे निबंधक सौरभ राव यांची 'रवळनाथ'चे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी पुणे येथे भेट घेतली. सहकार क्षेत्रातील आव्हाने आणि सहकारी संस्थांची प्रगती याविषयी चर्चा करण्यात आली.

यावेळी चौगुले यांनी राव यांना रवळनाथ हौसिंग फायनान्सची माहिती दिली. संस्थेची कार्यप्रणाली आणि अल्पावधीतील प्रगती याविषयी राव यांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी पुणे विभागातील सहकारी संस्थांच्या विकासासाठी तसेच सहकार क्षेत्राच्या वृद्धीसाठी आपण कटिबद्ध असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच सहकार रुजवण्यासाठी रवळनाथ संस्थेमार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचे कौतुकही त्यांनी केले. 'रवळनाथ'तर्फे चौगुले यांच्या हस्ते राव यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी 'रवळनाथ'चे संचालक प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, पुणे शाखा अध्यक्ष सुहास नाडगौडा, शाखाधिकारी अमर शिर्के उपस्थित होते.